## 2.2 Number of seats earmarked for reserved category as per GOI/ State Govt. rule during the year.( 2022-2023)

| Sr.NO | year 2022-23 | Sanctioned Post | Number of seats earmarked for reserved category as per GOI or | | | | | | | | | Total Student | | Number of students admitted from the reserved category | | | | | | | | | | | | | | | | | | Total Students |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | SC | ST | OBC | VJ-A | NT-B | NT-C | NT- D | EWS | open | | | SC (13%) | | ST (7%) | | OBC (19%) | | VJ-A (3%) | | NT-B (2.5%) | | NT-C(3.5%) | | NT-D (2%) | | EWS 10% | | Open 40% | | |
| | | | 13% | 7% | 19% | 2.5% | 2.5% | 3.5% | 2% | 10% | 40% | M | F | M | F | M | F | M | F | M | F | M | F | M | F | M | F | M | F | M | F | |
| 1 | B.Sc.-I | 120 | 16 | 8 | 23 | 4 | 3 | 4 | 2 | 12 | 48 | 48 | 17 | 3 | 1 | 0 | 0 | 2 | 2 | 2 | 2 | 1 | 1 | 3 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 37 | 10 | 65 |
| | B.Sc.-II | 120 | 16 | 8 | 23 | 4 | 3 | 4 | 2 | 12 | 48 | 29 | 19 | 3 | 2 | 0 | 1 | 1 | 0 | 1 | 4 | 2 | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 21 | 11 | 48 |
| | B.Sc.-III | 120 | 16 | 8 | 23 | 4 | 3 | 4 | 2 | 12 | 48 | 40 | 32 | 7 | 5 | 0 | 0 | 1 | 2 | 1 | 1 | 0 | 3 | 2 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 29 | 21 | 72 |
| | | | | | | | | | | | Total | 117 | 68 | 13 | 8 | 0 | 1 | 4 | 4 | 4 | 7 | 3 | 5 | 6 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 87 | 42 | 185 |
| 2 | B.A.-I | 120 | 16 | 8 | 23 | 4 | 3 | 4 | 2 | 12 | 48 | 156 | 24 | 12 | 6 | 0 | 0 | 3 | 3 | 7 | 5 | 4 | 1 | 5 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 35 | 9 | 90 |
| | B.A.-II | 120 | 16 | 8 | 23 | 4 | 3 | 4 | 2 | 12 | 48 | 94 | 20 | 7 | 4 | 0 | 0 | 1 | 1 | 5 | 2 | 0 | 1 | 4 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 20 | 11 | 57 |
| | B.A.-III | 120 | 16 | 8 | 23 | 4 | 3 | 4 | 2 | 12 | 48 | 89 | 19 | 8 | 6 | 0 | 0 | 2 | 2 | 4 | 1 | 3 | 0 | 2 | 2 | 0 | 0 | 0 | 0 | 16 | 8 | 54 |
| | | | | | | | | | | | Total | 339 | 63 | 27 | 16 | 0 | 0 | 6 | 6 | 16 | 8 | 7 | 2 | 11 | 3 | 0 | 0 | 0 | 0 | 71 | 28 | 201 |
| 3 | B.Com.-I | 120 | 16 | 8 | 23 | 4 | 3 | 4 | 2 | 12 | 48 | 56 | 16 | 2 | 5 | 0 | 0 | 2 | 1 | 3 | 0 | 0 | 2 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 13 | 8 | 36 |
| | B.Com.-II | 120 | 16 | 8 | 23 | 4 | 3 | 4 | 2 | 12 | 48 | 77 | 25 | 4 | 2 | 0 | 0 | 1 | 3 | 4 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 16 | 20 | 51 |
| | B.Com.-III | 120 | 16 | 8 | 23 | 4 | 3 | 4 | 2 | 12 | 48 | 80 | 18 | 2 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 3 | 2 | 1 | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 23 | 15 | 49 |
| | | | | | | | | | | | Total | 213 | 59 | 8 | 7 | 0 | 0 | 4 | 4 | 10 | 2 | 2 | 3 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 52 | 43 | 136 |
| 4 | M.A -I | 25 | 5 | 3 | 7 | 1 | 1 | 1 | 1 | 4 | 15 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | M.A -II | 25 | 5 | 3 | 7 | 1 | 1 | 1 | 1 | 4 | 15 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | Total | | 522 |

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR – 416 004
Phone : 0231-2609000 Special Cell –0231-260 9148.
Website : www.unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर ४१६ ००४
फोन ०२३१– २६०९००० विशेष कक्ष ०२३१–२६०९१४८
Estd : 1962
A++ Accredited by NAAC(2021)
With CGPA 3.52

(१)

जा.क्र.विशेष कक्ष/ २०२२–२३/636    दिनांक : 19 APR 2022

प्रति,

१. मा. प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

२. मा. सचिव,
सर्व संलग्नित शैक्षणिक संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

३. मा. अधिविभागप्रमुख,
सर्व पदव्युत्तर अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

विषय : १. सन २०२२ – २०२३ या शैक्षणिक वर्षामध्ये संलग्नित महाविद्यालये / शैक्षणिक संस्था तसेच विद्यापीठाच्या विविध पदव्युत्तर अधिविभागातील विद्यार्थी प्रवेशामधील आरक्षण
२. सन २०२२ – २०२३ या शैक्षणिक वर्षातील विद्यार्थी वसतिगृह (हॉस्टेल) प्रवेशाबाबत..

महोदय / महोदया,

उपरोक्त विषयासंदर्भात राज्य शासनाने अकृषी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालये / संस्था यांच्यामधील विद्यार्थी प्रवेशासाठी विहित केलेल्या सामाजिक आरक्षणाची टक्केवारी खालीलप्रमाणे आपणांस योग्य त्या कार्यवाहीसाठी कळविण्यात येत आहे.

| अ. क्र. | मागास प्रवर्ग | | आरक्षणाची विहित टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | अनुसूचित जाती | SC | १३ % |
| २. | अनुसूचित जमाती | ST | ७ % |
| ३. | विमुक्त जाती (अ) | VJA | ३ % |
| ४. | भटक्या जमाती (ब) | NTB | २.५ % |
| ५. | भटक्या जमाती (क) | NTC | ३.५ % |
| ६. | भटक्या जमाती (ड) | NTD | २ % |
| ७. | इतर मागासवर्ग | OBC | १९ % |
| ८. | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक | EWS | १० % |
| ९. | खुला | Open | ४० % |
| | | एकूण | १०० % |

**टीप:** संस्था/महाविद्यालयातील प्रवेशासाठीच्या जबाबदार अधिका–यांनी शासनाच्या विहित आरक्षण धोरणानुसार मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रवेशामध्ये आरक्षण देण्याची कार्यवाही शेवटच्या प्रवेश दिनांकापर्यंत करावयाची आहे.

**विद्यार्थी प्रवेशातील समांतर आरक्षणाबाबत :**

सामाजिक आरक्षणाबरोबरच खालीलप्रमाणे समांतर आरक्षण विद्यार्थी प्रवेशासाठी शासनाने निर्धारित केले आहे –

१. विद्यार्थी प्रवेश प्रक्रियेमध्ये महिलांसाठी पदवीस्तरावर शासन निर्णय क्र. जीईसी –२००० (१२३/२००७)/टी.ई.१ दि. १७.०४.२००० नुसार ३० टक्के आरक्षण देय आहे.

(सोबत पृष्ठ क्र. ६ ते ७)

२. शासन निर्णय क्र. संकीर्ण—२०१८/प्र.क्र.२३१/तांशि—४ दि.२५.६.२०१८ नुसार अकृषी विद्यापीठे संलग्नित महाविद्यालयातील सर्वस्तरीय प्रवेशामध्ये दिव्यांग (अपंग) विद्यार्थ्यांसाठी ५ टक्के आरक्षण देय आहे. (सोबत पृष्ठ क्र. ८ ते ९)

३. शासन निर्णय क्र. २०११/प्र. क्र. २०१२/क्र. ३ दि. ०२.०४.२०१८ नुसार अनाथ विद्यार्थ्यांना विद्यार्थी प्रवेशामध्ये १ टक्का आरक्षण देय आहे. (सोबत पृष्ठ क्र. १० ते १२)

४. माजी सैनिक व त्यांच्या पाल्यांना विद्यार्थी प्रवेशामध्ये १० टक्के आरक्षण देय आहे. यासंदर्भातील कार्यवाहीसाठी कृपया खालील शासन पत्रे, परिपत्रके, शासन निर्णय, अवलोकनी घेण्यात यावीत : (सोबत पृष्ठ क्र. १३ ते १८)

क) महाराष्ट्र शासनाचे क्र. औचिमु २०१२/प्र. क्र. १८७/विशि— ३ उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे दि. १६.०८.२०१२ रोजीचे शासन पत्र.

ख) महाराष्ट्र शासन, मा. शिक्षण संचालक, (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य यांचे क्र. युएनआय/२०१२/मा. सैनिक/अवि/विशि — ८/१८७११ दि. ०६.१२.२०१२ रोजीचे शासनपत्र.

ग) महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे क्र. माजीसै—२००६/(२४१/०६)/मशि—६ दि. १०.०९.२००७ रोजीचे शासन पत्र.

घ) महाराष्ट्र राज्य, शिक्षण व सेवा योजन विभागाचे क्र. टी.सी.एम.१२०४/१६७/८५/मा.शि. दि. १३.०६.१९८५ रोजीचे शासनपत्र.

ड) महाराष्ट्र राज्य, शिक्षण व सेवा योजन विभागाचे क्र. टी.सी.एम. १९८४/१८५/८४३/ मा. शि—४ दि. २८.०६.१९८४ रोजीचे पत्र.

च) महाराष्ट्र राज्य, सैनिक कल्याण विभागाचे क्र. १८१६४/शै.स/सैकवि—१७ दि.२८.०२.२०१७ रोजीचे पत्र.

छ) अराखीव उमेदवारांकरिता (खुला प्रवर्ग) आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी शासकीय सेवा व शैक्षणिक संस्थामध्ये प्रवेशाकरिता १०% जागा आरक्षित करण्याबाबतचा सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय दि. ३१.०५.२०२१

वरील सर्व शासन पत्रे, परिपत्रके, शासन निर्णय, इत्यादी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (www.unishivaji.ac.in) उपलब्ध आहेत.

**प्रवेश प्रक्रियेसंदर्भातील इतर सर्वसाधारण सूचना :**

१ संलग्नित महाविद्यालये/संस्था तसेच विद्यापीठातील विविध अधिविभागांनी गुणवत्ता यादी (Merit list) तयार करून खुल्या किंवा अराखीव संवर्गातील पर्याप्त जागांवर प्रथमत: विद्यार्थी/विद्यार्थीनींना त्यांच्या मागास प्रवर्गांचा विचार न करता गुणानुक्रमे खुल्या प्रवर्गातून प्रवेश द्यावा. (सोबत पृष्ठ क्र. १९)

२ वरीलबाबत मागासवर्गीय विद्यार्थी/विद्यार्थीनींना खुल्या प्रवर्गातील जागांवर त्यांच्या गुणानुक्रमे प्रवेश दिला जात असल्याने आरक्षणाची विहित मर्यादा अथवा टक्केवारी त्यामुळे ओलांडली असे होणार नाही, याबाबत योग्य ती दक्षता घ्यावी.

३ सामाजिक आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थी/विद्यार्थीनी यांनी (अनु. जाती/अनु.जमाती व्यतिरिक्त) विहित मुदतीतील शासनाच्या सक्षम प्राधिकाऱ्याचे नॉन—क्रिमिलेअर प्रमाणपत्र प्रवेशासाठी सादर करणे आवश्यक आहे. तसेच आर्थिक दुर्बल घटकांसाठीच्या १० टक्के आरक्षणांतर्गत प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थीनीं यांनीही त्याबाबतचे शासनाच्या सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र प्रवेशासाठी सादर करणे आवश्यक आहे. (सोबत पृष्ठ क्र.२० ते २२)

४ विद्यार्थी प्रवेशातील आरक्षणाची पदे ज्या मागास प्रवर्गासाठी राखीव आहेत त्याच मागास प्रवर्गातून सर्व नियमांचे काटेकोर पालन करुन भरणे आवश्यक आहे. संबंधित मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या उपलब्धते अभावी प्रवेश रिक्त रहात असतील तर अन्य मागास प्रवर्गातून रिक्त प्रवेश पूर्ण करण्याबाबत महाराष्ट्र शासनाच्या दि. ११.७.१९९७ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार कार्यवाही करावी.

**(सोबत पृष्ठ क्र.२३ ते २४)**

५ उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या दि.११.७.१९९७ रोजीच्या शासन निर्णयात विद्यार्थी प्रवेशातील आरक्षणाच्या जागा रिक्त राहिल्या तर त्याबाबत पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी (एम. फिल व पीएच. डी वगळून) करावयाची कार्यवाही, शासन निर्णयातील मुद्दा क्र. ३ व क्र. ४ येथे नमूद केली आहे. ती खालीलप्रमाणे :

मुद्दा क्र.(३): गुणवत्ता यादीनुसार प्रवेश प्रक्रिया केल्यानंतर जर कोणत्याही मागासवर्गीय प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागापैकी काही जागा रिक्त राहिल्या तर त्या जागेवर एकूण प्रवेश क्षमतेच्या जास्तीत जास्त २ टक्के पर्यंत प्रवेशासाठी विशेष मागास प्रवर्गीय उमेदवारांना प्रवेशासाठी प्राधान्य देण्यात यावे.

मुद्दा क्र. (४): रिक्त जागांवर विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांना कमाल २ टक्के जागांवर प्रवेश दिल्यानंतर जर जागा रिक्त राहिल्या तर त्या जागा इतर सर्व मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांची गुणवत्तेनुसार सरमिसळ करुन भरण्यात याव्यात.

वरीलप्रमाणे कार्यवाहीसाठी संबंधितांनी दि. ११.७.१९९७ रोजीचा मूळ शासन निर्णयही कृपया सविस्तर अवलोकनी घ्यावा. सदर शासन निर्णयातील तरतूदींच्या अनुषंगाने विद्यापीठाने राज्य शासनाकडून मार्गदर्शन मागविले आहे. ते प्राप्त होताच वा अन्य मार्गाने शासनाने वरील तरतूदींसंदर्भात काही अद्ययावत आदेश निर्गमित केल्यास त्यानुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे.

६ विद्यापीठातील पीजीबीयुटीआर विभागाद्वारे नियंत्रित होणाऱ्या एम.फिल/पीएच.डी प्रवेशासंदर्भात युजीसी वा अन्य शिखर संस्थानी विद्यार्थी प्रवेशाबाबत सूचना जारी केल्या असतील तर सदर प्रवेशासाठी त्या विचारात घेणेत याव्यात. संबंधितांनी यासंदर्भात पीजीबीयुटीआर विभागाच्या प्रवेश माहितीपुस्तिकेचे (Prospects) सुक्ष्म अवलोकन करावे. सदर एम.फिल/पीएच.डी अभ्यासक्रमांसाठीच्या प्रवेशातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी राखीव असलेल्या जागा विद्यार्थ्यांच्या उपलब्धतेऐवजी रिक्त राहिल्या तर त्या त्याच मागास प्रवर्गांतर्गत भरण्यासाठी पुन:श्च विशेष प्रवेश मोहिमेचे (Special drive) आयोजन संबंधित विभागाद्वारे करण्यात येईल. तसेच विशेष मोहिमेचे आयोजन करुनही मागास प्रवर्गातील प्रवेशाच्याजागा रिक्त राहिल्या तर त्या वर क्र.५ येथे नमूद केलेल्या दि. ११.७.१९९७ रोजीच्या शासन निर्णयातील तदतूदीनुसार भरण्यात याव्यात.

एम.फिल / पीएच.डी विद्यार्थी प्रवेशातील रिक्त राहिलेल्या मागासवर्गीय जागांबाबत विशेष कक्ष (विद्यापीठ प्रशासन व पदव्युत्तर अधिविभाग) स्थायी समितीच्या उपसमितीने केलेल्या शिफारसी, त्यांस मा. कुलगुरु व स्थायी समितीने दिलेली मान्यता यांच्या अनुषंगाने वरीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

(४)



सदर शासन निर्णयातील तरतूदींच्या अनुषंगाने विद्यापीठाने राज्य शासनाकडून मार्गदर्शन मागविले आहे. ते प्राप्त होताच वा अन्य मार्गाने शासनाने वरील तरतूदींसंदर्भात काही अद्ययावत आदेश निर्गमित केल्यास त्यानुसार कार्यवाही करणे आवश्यक राहील.

७ दिव्यांग (अपंग), अनाथ, माजी सैनिक इ. समांतर आरक्षणांतर्गत प्रवेशासाठी अर्ज करणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थीनी यांनी सदर आरक्षणाबाबत शासनाच्या संबंधित सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

८ विद्यापीठातील विविध अधिविभागांनी विद्यार्थी प्रवेशातील दिव्यांग (अपंग), अनाथ, माजी सैनिक इ. समांतर आरक्षणांतर्गत प्रवेश देत असताना, विशेष कक्ष (विद्यापीठ प्रशासन व पदव्युत्तर अधिविभाग) स्थायी समितीच्या उपसमितीने दि. २९.६.२०१८ रोजीच्या बैठकीतील मुद्दा क्र.२ बाबत नमूद केलेल्या अ,ब आणि क या टप्प्यानुसार कार्यवाही करावी. दि. २९.६.२०१८ रोजीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत सोबत देण्यात येत आहे.

**(सोबत पृष्ठ क्र.२५ ते २६)**

९ मा. सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल अपिल नं.३१२३/२०२० या प्रकरणी दि.०५ मे २०२१ रोजी दिलेल्या "सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास प्रवर्गाच्या" (एसईबीसी) आरक्षणसंदर्भातील निर्णयास अनुसरुन, " आर्थिकदष्टया दुर्बल घटक " (ईडब्लूएस) आरक्षणसंदर्भात निर्गमित केलेल्या महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाच्या दि.३१/०५/२०२१ रोजीच्या शासननिर्णयातील सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

**(सोबत पृष्ठ क्र.२७ ते ३४)**

१० महाविद्यालय/संस्था यांच्या स्तरावर विद्यार्थी प्रवेशातील आरक्षणाच्या संबंधाने काही विशेष बाब निर्माण झाल्यास अथवा तक्रारी प्राप्त झाल्यास त्यांचे निराकरण संबंधित महाविद्यालयातील/संस्थेतील प्रवेश समितीने, दंडक १५८ नुसार संबंधित महाविद्यालयात/संस्थेत गठित केलेल्या स्थायी समितीच्या माध्यमातून करावयाचे आहे. विद्यापीठ स्तरावरील यासंदर्भातील कार्यवाही संबंधित अधिविभागातील प्रवेश समिती आणि विशेष कक्ष स्थायी समिती (विद्यापीठ प्रशासन व पदव्युत्तर अधिविभाग) अथवा स्थायी समिती गठित उपसमिती यांचेद्वारे करण्यात येईल.

११ स्कॉलरशीप अथवा फ्रिशीपसाठी अर्ज करणाऱ्या पात्र मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून, शासनाच्या सामाजिक न्याय व सांस्कृतीक कार्य, क्रीडा व विशेष सहाय विभागाच्या क्र. इबीसी.२००३/प्र.क्र./३०१/मावक–२ दि. १.११.२००३ रोजीच्या शासन निर्णयानुसार कोणतेही शैक्षणिक शुल्क घेता येणार नाही.

१२ शासनाने विद्यार्थी प्रवेशासाठी लागू केलेल्या सामाजिक आरक्षणापैकी ज्या मागास प्रवर्गांच्या आरक्षणासंदर्भातील बाबी न्यायप्रविष्ठ आहेत त्यासंदर्भातील पुढील कार्यवाही मा.न्यायालयाचे न्यायनिर्णय, व सदरबाबत शासनाकडून ज्या त्या वेळी प्राप्त होणारे शासन निर्णय/परिपत्रके इ. नुसार करणे बंधनकारक आहे.

१३ विद्यार्थी प्रवेशामध्ये सामाजिक अथवा समांतर आरक्षण लागू करण्यासंदर्भात शासनाने शासन निर्णय/परिपत्रके/शासन पत्रे इ. द्वारे विहित केलेल्या सर्व शर्ती आणि अटी या आरक्षणांतर्गत प्रवेश घेण्यासाठी लागू आहेत.

१४ महाविद्यालय/शैक्षणिक संस्था तसेच विद्यापीठातील विविध अधिविभागातील विद्यार्थी प्रवेशातील आरक्षणाबाबत उपरोक्त प्रमाणे सर्वसाधारण सूचना करण्यात येत आहेत. तथापि, त्यामध्ये मा. न्यायालयाचे न्यायनिर्णय, शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणारे नियम, अधिनियम, अधिसूचना, शासन आदेश, परिपत्रके, शुध्दीपत्रके, विद्यापीठ

नियम इ. द्वारे बदल करण्यात आल्यास त्या अनुषंगाने योग्य ती पुढील कार्यवाही करुन सन २०२२—२३ मधील विद्यार्थी प्रवेश प्रक्रिया विहित पध्दतीचा अवलंब करुन नियमानुसार करण्यात यावी.

महाविद्यालय/शैक्षणिक संस्था तसेच विद्यापीठातील विविध अधिविभागांमध्ये सन २०२२—२३ करिता देण्यात येणाऱ्या विद्यार्थी प्रवेशातील आरक्षणाची माहिती विद्यापीठाच्या सांख्यिकी विभागाद्वारे स्वतंत्र परिपत्रकान्वये मागविण्यात येईल. त्यानुसार संबंधित विभागाकडे विहित प्रपत्रातील माहिती महाविद्यालये/शैक्षणिक संस्था तसेच विद्यापीठातील विविध अधिविभागानी तात्काळ देणे अत्यावश्यक आहे याची नोंद घेण्यात यावी.

कळावे.

आपला विश्वासू,

प्र. कुलसचिव

सोबत : वरीलप्रमाणे

प्रत : माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी

१. पदव्युत्तर प्रवेश विभाग
२. पीजी बीयुटीआर विभाग
३. सांख्यिकी विभाग

(६)

200408111302400-2152

महाराष्ट्र राज्यातील सर्व पारंपारिक विद्यापीठे व त्यांना संलग्नित असलेल्या महाविद्यालयातील पदवी अभ्यासक्रमांकरिता महिलांसाठी ३०टक्के आरक्षण ठेवण्याबाबत

## महाराष्ट्र शासन

### उच्च व तंत्र शिक्षण विभाग

शासन निर्णय क्र. सीईसी-२०००/(१२१/२०००)/तांशि-१
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२
दिनांक: १७ एप्रिल, २०००

**प्रस्तावना:-**

भारताच्या संविधानात, स्त्री-पुरुष भेद न ठेवता समानतेचे तत्त्व हा नागरीकांचा मूलभूत हक्क मानण्यात आला आहे. तसेच महिलांच्या बाबतीतही घटनेत सकारात्मक धोरण स्विकारण्यात आले आहे. महिलांना पुरुषांच्या बरोबरीने संधी देणे अपेक्षित असले तरी विविध शिक्षण अभ्यासक्रमाकरिता स्त्रियांना समान संधी प्रत्यक्षात मिळत नाही. स्त्रियांच्या शैक्षणिक उन्नतीसाठी त्यादृष्टीने खरा प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्यानुसार महिलांचे बलशालीकरण आणि समाजाच्या सर्व क्षेत्रामध्ये महिलांचा सक्रिय सहभाग करून सर्वांगीण मानवी विकासाच्या विविध क्षेत्रामध्ये सकारात्मक परिणाम घडवून आणण्यासाठी महिलांच्या शिक्षणाकडे अग्रक्रमाने लक्ष देणे आवश्यक आहे. ही बाब विचारात घेऊन शासन निर्णय दि.२२.६.१९९४ अन्वये शासनाने महिलांना शासकीय नोकरीमध्ये ३०टक्के जागा आरक्षित ठेवल्या आहेत. यामागील खरा हेतू साध्य होण्याकरिता आता महिलांना पदवी अभ्यासक्रमाकरिता ३०टक्के आरक्षण ठेवणे आवश्यक आहे. त्यानुसार महाराष्ट्र राज्यात पदवी स्तरावरील सर्व अभ्यासक्रमांकरिता महिलांसाठी ३०टक्के आरक्षण ठेवण्याबाबत शासनाचा विचार होता.

**शासन निर्णय:-**

वरील सर्व वस्तुस्थिती विचारात घेऊन शासन आता असे आदेश देत आहे की, महाराष्ट्र राज्यातील सर्व पारंपारिक विद्यापीठे व त्यांना संलग्नित असलेल्या, सर्व शासकीय, अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालयांतील पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरिता महिलांसाठी ३०टक्के आरक्षण ठेवण्यात येत आहे.

सदरचे आरक्षण बिनराखीव व राखीव या दोन्ही प्रवर्गासाठी लागू राहील. जर बिनराखीव जागा १०० असतील तर त्यापैकी ३० जागा महिलांकरिता आरक्षित राहतील.

तसेच सदरचे आरक्षण हे सध्या विविध सामाजिक प्रवर्गांकरिता विहित केलेल्या संविधानात्मक राखीव जागा अंतर्गत समांतर आरक्षण (Horizontal) राहील. उदाहरणार्थ असे की, सध्या संविधानातील तरतुदीनुसार शासनाने अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता १३ टक्के जागा आरक्षित आहेत. त्यापैकी त्यातील ३०टक्के आरक्षण हे अनुसूचित जाती या प्रवर्गातील महिला उमेदवारांकरिताच ठेवण्यात येईल व जर या प्रवर्गातील किमान पात्रता असलेल्या महिला उमेदवार प्राप्त न झाल्यास त्या जागा अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील पुरुष संवर्गातून भरण्यात येतील. म्हणजेच जर प्रवेशाकरिता एखाद्या विद्याशाखेसाठी प्रथम वर्षासाठी १०० जागा असतील तर त्यापैकी १३ जागा अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील उमेदवारांकरिता सध्या असलेले आरक्षण विचारात घेऊन त्यापैकी ३०टक्के म्हणजेच ४ जागा ह्या अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील महिला उमेदवारांकरिता आरक्षित राहतील.

वर उल्लेखिलेल्या पध्दतीनेच सर्व प्रवर्गांकरिताची सध्या असलेल्या आरक्षणांतर्गत ३० टक्के समांतरपणे आरक्षण ठेवण्यात येईल. तसेच ज्या पदवी अभ्यासक्रमांकरिता मुस्लिमांकरिता व ५ जागांवर देण्यात येणाऱ्या प्रवेशा अंतर्गत देखील ३० टक्के आरक्षण महिलांकरिता देण्यात येईल.

राज्यातील सर्व तंत्र निकेतनांमध्ये पदविका अभ्यासक्रमासाठी महिलांकरिता शासन निर्णय क्र. टीईएम-१०९५/(२७१९)/तांशि-५, दि.१७.१.१९९६ अन्वये ठेवलेल्या २५ टक्के आरक्षणात वाढ करून आता ते ३० टक्के इतके करण्यात येत आहे.

सदरच्या आरक्षित जागांवर जर महिला उमेदवार उपलब्ध झाल्या नाहीत तर या रिक्त जागा त्याच शैक्षणिक वर्षात पुरुष संवर्गातून भरण्यात येतील व या रिक्त जागांचा त्या पुढील शैक्षणिक वर्षात अनुशेष धरला जाणार नाही.

वैद्यकीय शिक्षण विभाग आणि कृषि व पदुम विभागांतर्गत येणाऱ्या सर्व पदवी अभ्यासक्रमांकरिता आदेश संबंधित विभागांकडून स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

सदरचे आरक्षणविषयक आदेश शैक्षणिक वर्ष सन २०००-२००१ पासून अंमलात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

(प्र. ह. क्षीरसागर)
शासनाचे सहसचिव

प्रत,
संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक, उद्योगधंदे-संस्था-समन्वय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
ग्रंथालय संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व विद्यापीठांचे कुलगुरू व कुलसचिव
सर्व सहसंचालक, तंत्र शिक्षण / उच्च शिक्षण, विभागीय कार्यालये.
प्राचार्य, सर्व अभियांत्रिकी/तंत्रशास्त्र महाविद्यालये, तंत्र निकेतने व संस्था (तंत्र शिक्षण संचालकामार्फत)
प्राचार्य, सर्व वरिष्ठ महाविद्यालये (उच्च शिक्षण संचालकामार्फत)
मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव.
मा. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहाय्यक.
मा. सचिव, कृषि यांचे स्वीय सहाय्यक.
मा. सचिव, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय यांचे स्वीय सहाय्यक.
मा. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग यांचे स्वीय सहाय्यक,
मा. सचिव, शालेय शिक्षण यांचे स्वीय सहाय्यक,
मा. प्रधान सचिव, वित्त यांचे स्वीय सहाय्यक,
मा. सचिव (सर्वसाधारण उपविभाग), सामान्य प्रशासन विभाग यांचे स्वीय सहाय्यक.
सर्व मंत्रालयीन विभाग.
सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखाली येणारी सर्व विभागीय कार्यालये (संबंधित विभागामार्फत)
सर्व कार्यासने, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
निवड नस्ती, तांशि-१.

तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील उच्च शिक्षणाच्या शासकीय व अशासकीय अनुदानित संस्थांमध्ये प्रवेशासाठी केंद्र शासनाच्या The Rights of Persons with Disabilities Act, २०१६ च्या तरतूदीनुसार कार्यवाही करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२३१/तांशि-४
मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २५ जून, २०१८

संदर्भ : १) The Rights of Persons with Disabilities Act, २०१६.
२) आयुक्त, अपंग कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.अकआ/प्र-७/मोफतशिक्षण/क-३१(२)/२०१७-१८/२८, दिनांक २०/६/२०१७.
३) संचालक तंत्र शिक्षण यांचे पत्र क्र. २-अ/एडीएम/२०१८/४७४, दिनांक १०/४/२०१८.

**प्रस्तावना :-**

केंद्र शासनाने The rights of persons with Disabilities Act, २०१६, दिनांक २८ डिसेंबर,२०१६ रोजी राजपत्रात प्रसिध्द केला आहे. या अधिनियमाच्या कलम ३२ मध्ये पुढीलप्रमाणे तरतूद आहे :-

१) All Government institutions of higher education and other higher education institutions receiving aid from the Government shall reserve not less than five per cent seats for persons with benchmark disabilities.
२) The person with benchmark disabilities shall be given an upper age relaxation of five years for admission in institutions of higher education.

केंद्र शासनाच्या या अधिनियमातील तरतूदीनुसार तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील पदवी व पदव्युत्तर शिक्षण देणाऱ्या विविध शासकीय व अशासकीय अनुदानित संस्थांमध्ये लक्षणीय अपंगत्व असणाऱ्या व्यक्ती/विद्यार्थ्यांकरीता ५ टक्के इतक्या जागा राखीव ठेवणे आवश्यक आहे.

**शासन निर्णय :-**

The Rights of Persons with Disabilities Act, २०१६ च्या कलम ३२ (१) मधील तरतूदीनुसार तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील पदवी व पदव्युत्तर शिक्षण देणाऱ्या विविध शासकीय व अशासकीय अनुदानित संस्थांमध्ये लक्षणीय अपंगत्व

असणाऱ्या व्यक्ती/ विद्यार्थ्यांकरीता ५ टक्के इतक्या जागा राखीव ठेवण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. या निर्णयाची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून करण्यात यावी. यासाठी विविध अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमामध्ये आवश्यक ती सुधारणा करण्यात यावी.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१८०६२५१८०५५६०४०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sanjay A. Dharurkar

(संजय औ.धारुरकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा तथा सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, ८ वा मजला, न्यु एक्सलसिअर इमारत, ए.के.नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१
२. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३. आयुक्त, अपंग कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. सर्व सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय.
५. कुलसचिव, सर्व अकृषी सार्वजनिक विद्यापीठे.
६. सर्व संबंधित संस्था (तंत्र शिक्षण संचालनालयामार्फत).
७. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. निवड नस्ती/तांशि-४.

अनाथ मुलांना खुल्या प्रवर्गातून १% टक्का समांतर आरक्षण देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः अमुजा-२०११/ प्र.क्र. २१२/ का-३,
नविन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक - ०२ एप्रिल, २०१८.

वाचा- शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग, क्र.संकीर्ण-२०१३/प्र.क्र.१०९/का-३, दिनांक ०६.०६.२०१६.

**प्रस्तावना :-**

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ अन्वये काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या अनाथ, निराधार बालकांना पोलीस, स्वयंसेवी संस्था, पालक यांचेकडून बाल कल्याण समितीमार्फत बालगृहात प्रवेश दिला जातो. ० ते १८ वयोगटातील अशा मुलांना बालगृहामध्ये अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य सुविधा, शिक्षण, प्रशिक्षण इत्यादी सुविधा पुरविल्या जातात व पुनर्वसनासाठी प्रयत्न केले जातात. अनाथ मुलांना त्यांचा संस्थेतील कालावधी संपल्यानंतर संस्थेच्या बाहेर पडल्यानंतर अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. अनाथ मुलांची जात नक्की माहिती नसल्याने, त्यांना कोणत्या एका विशिष्ट प्रवर्गात समाविष्ट करता येत नाही. जातीचा दाखला नसल्यामुळे, त्यांना विविध शासकीय लाभापासून वंचित रहावे लागते. त्यामुळे त्यांच्या भावी आयुष्यात अनेक अडचणी निर्माण होतात. अनाथ मुलांकडे कोणतीही कागदपत्रे व पुरावे नसल्यामुळे, त्यांना जातीचे प्रमाणपत्र मिळत नाही व त्यामुळे त्यांना विविध शासकीय सवलतींपासून वंचित रहावे लागते. त्यामुळे अनाथ मुलांना राज्य शासनाच्या विविध सवलतींचा लाभ घेता यावा, याकरीता आरक्षण लागू करणेबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यानुसार दिनांक १७ जानेवारी, २०१८ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत अनाथ मुलांना शिक्षण व नोकरी यामध्ये १% समांतर आरक्षण लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

**शासन निर्णय:-**

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ अन्वये काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या अनाथ, निराधार बालकांना संस्थेतून बाहेर पडल्यानंतर जातीचा दाखला नसल्यामुळे विविध शासकीय लाभांपासून वंचित रहावे लागते त्यामुळे अनाथ मुलांना राज्य शासनाच्या विविध सवलतींचा लाभ घेता यावा याकरीता शिक्षण व नोकरी यामध्ये खुल्या प्रवर्गातून १% समांतर आरक्षण लागू करण्यात येत आहे. त्यासाठी खालील अटी व शर्ती निश्चित करण्यात येत आहेत-

१) बालगृहातील व इतर अनाथ मुलांपैकी महिला व बाल विकास विभागाकडून देण्यात येणारे अनाथ प्रमाणपत्र असणा-या मुलांसाठीच हे आरक्षण लागू राहील. ज्या मुलांच्या कागदपत्रावर कोणत्याही जातीचा उल्लेख नाही व ज्याचे आईवडील, काका-काकू, आजी-आजोबा व चुलत भावंडे व इतर नातेवाईक यापैकी कोणाबाबतही माहिती उपलब्ध नाही, अशा मुलांनाच अनाथ आरक्षण लागू राहील.

२) तरीच ज्या मुलांचे आई वडिल हयात नसून त्यांचेकडे जातीचे प्रमाणपत्र नाही, अशा मुलांच्या बाबतीत त्यांनी संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचेकडे अर्ज करणे आवश्यक राहील. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचेकडून संबंधित जिल्ह्याच्या बाल कल्याण समितीकडे सदर अर्ज पाठविण्यात येईल. बाल कल्याण समितीकडून सदर अर्जाची तपासणी करण्यात येईल व आवश्यकतेनुसार पोलीस / महसूल विभागाच्या यंत्रणेकडून छाननी करुन तसेच मुलाखत घेऊन अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ४० दिवसात आपली शिफारस संबंधित विभागीय उपायुक्त, महिला व बाल विकास यांचेकडे निर्णयार्थ पाठविण्यात येईल. बाल कल्याण समितीची शिफारस विचारात घेऊन विभागीय उपायुक्त, महिला व बाल विकास यांचेकडून अनाथ प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही करण्यात यावी. तसेच शिफारस अमान्य करण्यात येऊन अनाथ प्रमाणपत्र नाकारण्यात आल्यास विभागीय उपायुक्त महिला व बाल विकास यांचेकडून कारणासहित सदर अर्ज बाल कल्याण समितीकडे परत पाठविण्यात येईल. प्रमाणपत्राच्या अनुषंगाने जर कांही तक्रार असल्यास यासंदर्भात अपिलीय प्राधिकारी हे आयुक्त, महिला व बाल विकास हे राहतील.

३) उपरोक्त वाचा मधील दिनांक ०६.०६.२०१६ च्या शासन निर्णयानुसार महिला व बाल विकास विभागामार्फत बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियमांतर्गत मान्यता प्राप्त (अनुदानित/विनाअनुदानित) संस्थामध्ये दाखल मुलांना अनाथ प्रमाणपत्र देणेबाबतची कार्यवाही विहीत करण्यात आली आहे. त्यानुसार अनाथ प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही करण्यात यावी.

४) सदर निर्णय, शासन निर्णय लागू झाल्याच्या दिनांकापासून पुढे होणा-या सरळसेवा भरतीसाठी लागू राहील.

५) शासन सेवेत प्रवेशासाठी अनाथ मुलांसाठी खुल्या प्रवर्गातून १% समांतर आरक्षण गट " अ" ते "ड"च्या सर्व पदावर लागू राहील.

६) सदर आरक्षणाची गणना पद भरती करण्यात येणा-या रिक्त पदावर करण्यात यावी.

७) संबंधित भरती वर्षात अनाथ उमेदवार उपलब्ध न झाल्यास आरक्षणाचा अनुशेष पुढे न ओढता खुल्या प्रवर्गातून गुणवत्तेनुसार इतर उमेदवारांची नियुक्ती करण्यात यावी.

८) त्याचप्रमाणे शिक्षणांतर्गत शिष्यवृत्ती, वसतिगृह व व्यावसायिक शिक्षणांतर्गत शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजनेमध्ये सदर आरक्षण लागू राहील.

९) अनाथ आरक्षण प्रमाणपत्राच्या अनुषंगाने एखाद्या मुलाची नोकरीमध्ये नियुक्ती झाल्यास त्याने सादर केलेल्या अनाथ प्रमाणपत्राची फेरतपासणी आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांच्या मार्फत करणे आवश्यक राहील.

१०) अनाथ आरक्षणाबाबत करावयाच्या कार्यवाहीच्या अनुषंगाने सविस्तर मार्गदर्शक सूचना स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

११) अनाथ आरक्षणाच्या लाभाच्या अनुषंगाने काही समस्या उद्भवल्यास त्याबाबत अभिनिर्णय घेण्याचा अधिकार शासनास राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०४०२१३०९१३८०३० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sandhya Sudhir Gawas

( सं.सु.गवस )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव
२. सर्व मंत्रालयीन विभाग
३. संचालक, माहिती व जनसंपर्क, मंत्रालय, मुंबई.
४. सचिव, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, वरळी, मुंबई.
५. आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे.
६. सर्व उप सचिव, अवर सचिव, कक्ष अधिकारी, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. सर्व विभागीय महिला व बाल विकास अधिकारी,
८. सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी.
९. निवड नस्ती / का-३

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१
Web:www.dirhe.org.in E-Mail: info@dirhe.org.in
फोन नं ०२०/२६१२२११९, २६०५१५६२, २६१३०६२७, २६१२४६३९ फॅक्स नं.०२० २६१२१२५३ २६०५६०७९

क्रमांक - युएनआय/२०१२/मा.सैनिक/अवि/विशि-८ 7८११ दिनांक ६/१२/२०१२

प्रति,

कुलसचिव,
सर्व अकृषी विद्यापीठे

विषय:- राज्यातील विद्यापीठात माजी सैनिकांसाठी जागा राखुन ठेवण्याबाबत.
संदर्भ:- प्र.गि.कानडे, कक्ष अधिकारी यांचे क्र.औचमु२०१२/प्र.क्र.१८७/विशि-३, दिनांक-२६/८/२०१२ चे पत्र.

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, राज्यातील विद्यापीठात तसेच महाविद्यालयात माजी सैनिकांच्या मुलांसाठी जागा राखीव ठेवण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात आले असून त्याची अंमलबजावणी करण्याबाबतही आदेश देण्यात आले आहेत. तथापि सदर शासन आदेशांची अंमलबजावणी योग्यरितीने होत नसल्याचे संदर्भिय पत्रान्वये कळविण्यात आले आहे. तरी सदर प्रकरणाबाबतची सद्यस्थितीची माहिती शासनास सादर करावी व त्याची प्रत संचालनालयास सादर करण्यात यावी.

शिक्षण संचालक, उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे १
यांचेकरिता

प्रत :- प्र.गि.कानडे, कक्ष अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,मुंबई-३२, यांना उपरोक्त संदर्भाधिन पत्रान्वये माहितीस्तव सादर.

SOLAPUR UNIVERSITY, SOLAPUR
INWARD NO. 619
DATE:- 28 DEC 2012

महाराष्ट्र शासन

क्र. औचिमु २०१२ / प्रक्र. १८७ /विशि-३
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-३२
दिनांक :- १६ ऑगस्ट, २०१२

प्रति,

कुलसचिव,
सर्व अकृषी विद्यापीठे,

विषय :- राज्यातील विद्यापीठात माजी सैनिकांसाठी जागा राखून ठेवण्याबाबत.

महोदय,

राज्यातील विद्यापीठात तसेच महाविद्यालयात माजी सैनिकांच्या मुलांसाठी जागा राखीव ठेवण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात आले असून त्याची अंमलबजावणी करण्याबाबतही आदेश देण्यात आले आहेत. (प्रती सोबत जोडल्या आहे ) तथापी सदर शासन आदेशांची अंमलबजावणी निटपणे होत नसल्याचे निदर्शनास आले आहे. यास्तव आपणास याव्दारे विनंती करण्यात येते की, सदर आदेशांची विद्यापीठात तसेच संलग्नीत महाविद्यालयांमध्ये काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात येईल याची दक्षता घेण्यात यावी.

आपला,

(प्र. गि. कानडे)
कक्ष अधिकारी

प्रत,

संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांना आवश्यकत्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

SOLAPUR UNIVERSITY, SOLAPUR
INWARD NO. 31
DATE:- 30 AUG 2012

शैक्षणिक आरक्षण - माजी सैनिक कल्याण
अभियांत्रिकी महाविद्यालये, टेक्नीकल, टेक्नॉलॉजीकल,
पॉलीटेक्नीक, कला, वाणिज्य, अध्यापक महाविद्यालये

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्रशिक्षण विभाग
शासन परिपत्रक क्र. माजीसै- २००६/(३४३/०६)/मशि-६
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई- ३२
दिनांक: १० सप्टेंबर, २००७

संदर्भ- १) शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग, क्र. टीसीएम-
१८८४/(१८५/८४)/तांशि-४ दि. २८ जून, १९८४.
२) शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, क्र. आयटीआय-
१००२/प्र.क्र. ५१/व्यशि-२, दि. १० एप्रिल, २००२
३) शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्र. सीईटी-
२११२/(५०३३)(१)/तांशि-६ दि. [illegible] एप्रिल, १९९२

परिपत्रक- आजी /माजी सैनिकांच्या मुलांना शाळा / कॉलेज यामधील प्रवेशासाठी, अभियांत्रिकी महाविद्यालय टेक्नीकल / टेक्नॉलॉजीकल व पॉलीटेक्नीक शिक्षणासाठी प्रवेशासाठी [illegible] % जागा तसेच अध्यापक महाविद्यालयांच्या एकूण प्रवेश क्षमतेपैकी ५ % जागा तसेच शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधून १ % जागा किंवा जास्तीत जास्त १० जागा आरक्षित केलेल्या आहेत. असे असले तरी सदर निर्णयांची काटेकोरपणे अंमलबजावणी होत नसल्याचे, राज्यातील माजी सैनिकांच्या कल्याणार्थ उपाययोजना करण्याच्या [illegible] नेमलेल्या तदर्थ समितीने, अहवालान्वये शासनाच्या निदर्शनास आणलेले आहे. सदर अहवाल विधानपरिषदेत दि. २०.४.२००६ रोजी सादर करण्यात आला आहे.

२. सदर अहवालाच्या अनुषंगाने पुन्हा एकदा निदर्शनास आणण्यात येते की, राज्यातील आजी/ माजी सैनिकांच्या कल्याणार्थ शासन विविध योजना राबवित असते. त्याद्वारे माजी सैनिक/ युध्दविधवा/ माजी सैनिकांच्या विधवा/ माजी सैनिकांचे अवलंबित यांचा सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक स्तर उंचावण्यासाठी शासन कटिबध्द आहे. त्यामुळे आजी/ माजी सैनिकांच्या मुलांना शाळा / कॉलेज यामधील प्रवेशासाठी शासनाने विहीत केल्यानुसार जागा राखीव ठेवण्यात येवून त्या फक्त संबंधित उमेदवारांमधूनच भरण्यात याव्यात. सदर जागा इतर प्रवर्गातून भरल्या जावू नयेत. जे संस्थाचालक आदेशाची अंमलबजावणी करीत नाहीत [illegible] कडक कारवाई करण्यात यावी. प्रत्येक शैक्षणिक वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेवेळी संबंधित जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, आजी/माजी सैनिकांच्या पाल्यांच्या शैक्षणिक प्रवेशाचा आढावा घेतील त्यावेळी त्यांना सर्वतोपरी सहकार्य करण्याच्या सूचना सर्व संबंधितांना देण्यात याव्यात.

हे शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. 200709101[illegible]46001 असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(नि. न. भोसले)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

(१६)

व महाराष्ट्रातील विद्यापीठांच्या कोणत्याही शाखेत प्रतिवर्ष 10 टक्के जागा राखून ठेवण्याबाबत.

(२)

महाराष्ट्र राज्य
शिक्षण व सेवा योजन विभाग,
क्रमांक टी.सी.एम. 1204/167/85/ मा.शी.
मंत्रालय विस्तार, मुंबई-400032

प्रति,
श्री. सुर्वे, कक्ष अधिकारी
सा.प्र.वि.(मा.सै.क.) कार्या-२८

दिनांक 13 जून, 1985.

परिपत्रक
==========

खाजगी अनुदानित प्रकारच्या विद्यालयाच्या बाबतीत त्याच प्रमाणे शासकीय विद्यालये, महाविद्यालये, महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठातील सर्व शाखांमध्ये प्रवेश देण्याबाबत शासन निर्णय, शिक्षण, क्रिडा व समाज कल्याण विभाग क्रमांक टी.सी.एम. / 271/39586/इक्स्यु दिनांक 31 मे 1974 आणि टी.सी.एम. 84/183/85/ मा.शी. 28 जून 1984 नियमावली विहित करण्यात आली आहे. त्याच प्रमाणे महाविद्यालयामध्ये व महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांच्या सर्व शाखांमध्ये प्रवेश देण्याकरिता शासनाने वेळोवेळी निकष विहित केले आ

2. महाविद्यालयाच्या बाबतीत शासनाने विहित केलेल्या निकषाच्या आधारावर संबंधित विद्यापीठाने स्वतंत्रपणे नियमावली विहित केली आहे.

3. महाराष्ट्र शासनाने एक प्रोत्साहनात्मक बाब म्हणून आजी व माजी (डिफेन्स परसोनेल) सशस्त्र आर्मी, नेव्ही व एअर फोर्स मधील कर्मचारी, सिर्व्हिस्मन, टेम्पररी, अपंगत्वी आणि सैनिकांना तसेच त्यांच्या मुलांना पुढील प्रमाणे विद्यालयात व महाविद्यालयात तसेच विद्यापीठाच्या सर्व शाखांमध्ये 1985-86 च्या शैक्षणिक वर्षापासून जागा राखून ठेवून त्याप्रमाणे त्या राखीव जागावर आजी व माजी (डिफेन्स परसोनेल) आर्मी, नेव्ही, एअर फोर्स मधील सिर्व्हिस, टेम्पररी, अपंगत्वी व सैनिकांना तसेच त्यांच्या मुलांना प्रवेश द्यावेत असे निर्णय घेतला आहे.

आजी व माजी (डिफेन्स परसोनेल) सशस्त्र आर्मी, नेव्ही व एअर फोर्स मधील कर्मचारी, सिर्व्हिस, ऑफिसर, टेम्पररी, अपंगत्वी व [redacted] मात्र या आजी व माजी (डिफेन्स परसोनेल) सैनिकांना तसेच त्यांच्या मुलांसाठी प्रवेश मिळविताना, क

(१८)



राखीव जागांपैकी (एकूण) दहा जागांपेक्षा जास्त नसाव्यात".

4. विद्यालये, महाविद्यालये तसेच विद्यापीठाचे सर्व विभाग सुरू झालेले आहेत व त्यामध्ये प्रवेश देणे आता विहित नियमावली प्रमाणे शक्य नाही तरी देखील एक खास बाब म्हणून गुणानुसार प्रत्येक विद्यालयात, महाविद्यालयात तसेच विद्यापीठाच्या प्रत्येक विभागामध्ये या जादा विद्यार्थ्यांना त्वरीत प्रवेश द्यावेत अशी विनंती संबंधित प्राचार्यांना, शिक्षण उपसंचालकांनी त्वरीत करावी. सदर वाढीव क्षमतेस विद्यापीठाकडून मान्यता मिळावी म्हणून प्रत्येक विद्यापीठाकडे शासनातर्फे स्वतंत्रपणे प्रस्ताव पाठविण्यात आलेले आहेत.

या वाढीव जागांसाठी, संबंधीत महाविद्यालय अधिक शिक्षक वर्ग व जादा अनुदान मंजूरी करता येणार नाही. उपलब्ध शिक्षक वर्गावरच या विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्याची जबाबदारी सोपविण्यात यावी.

5. प्रत्येक जिल्हा शिक्षण अधिकारी/ अधिकाऱ्यांनी विभागीय शिक्षण उपसंचालकांनी या बाबत योग्य ती कारवाई करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनाला त्वरीत सादर करावा. विहित नियमावली मधील सुधारणा समावेश करण्याबाबत स्वतंत्र आदेश करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

सही - अस्पष्ट
उपसचिव
महाराष्ट्र राज्य

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

उपरोक्त शासन परिपत्रक विभाग प्रमुख (विद्यापीठाचे विविध अधिविभाग) तसेच प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये/शिक्षण संस्था यांना माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे.

तसेच ज्या महाविद्यालयांच्या संस्थेची एकापेक्षा जास्त महाविद्यालये असतील त्या महाविद्यालयांनी सदरचे शासन परिपत्रक संस्थेच्याही निदर्शनास आणावे.

उपकुलसचिव

जा.क्र. विशेष कक्ष/फो. 4 अ/137

दि. 0?/10/2010

(१८)

दूरध्वनी 020-66262629
ई-मेल : [illegible]

सैनिक कल्याण विभाग,
महाराष्ट्र राज्य [illegible]
राष्ट्रीय युद्ध स्मारक[illegible]
घोरपडी, पुणे-411 001

क्रमांक : 18161/[illegible]/शैक्षणिक-17 [illegible]

दिनांक : [illegible]

मा. कुलगुरू
शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर
(महाराष्ट्र राज्य सर्व विद्यापीठ)

विषय : शैक्षणिक अभ्यासक्रमांसाठी आजी-माजी सैनिकांच्या पाल्यांसाठी जागा राखीव ठेवणेबाबत.

संदर्भ : १. महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन परिपत्रक क्र. माजीसै-२००६/(२४३/०६)/मांश-६ दिनांक १० ऑक्टोबर २००६.
२. पुणे विद्यापीठ पत्र क्रमांक आरक्षण/ओ-५१/२०१४ दिनांक २६ जून २०१८
३. महाराष्ट्र शासन [illegible]-१०१४/प्र.क्र.१३१/मांश-२ दिनांक २१ जून २०१८

२. उपरोक्त विषयी संदर्भीय शासन परिपत्रक व शासन निर्णयांनी तरतुदीनुसार विविध शैक्षणिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी राज्यातील आजी-माजी सैनिकांच्या पाल्यांना जागा आरक्षित ठेवण्यात आल्या आहेत.

३. त्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येत की, आपल्या विद्यापीठाच्या अधिपत्याखालील सर्व महाविद्यालयांमध्ये (अभियांत्रिकी महाविद्यालये, टेक्निकल, टेक्नोलॉजिकल, पॉलीटेक्निक, कला, वाणिज्य व अध्यापक महाविद्यालये) सर्व अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेमध्ये आजी-माजी सैनिकांच्या पाल्यांना आरक्षणाचा लाभ देण्यात यावा.

४. तसेच संदर्भीय शासन निर्णयातील तरतुदीनुसार शैक्षणिक वर्ष २०१७-२०१८ पासून [illegible] शैक्षणिक वर्षापासून माजी सैनिकांच्या पाल्यांना राखीव ठेवण्यात आलेल्या जागेवर प्रवेश देते वेळी माजी सैनिकांच्या पाल्यांकडे संबंधीत जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाकडून देण्यात आलेले **"माजी सैनिक पाल्य असल्याबाबतचे प्रमाणपत्र"** असल्याशिवाय प्रवेश देण्यात येऊ नये. [illegible] केलेल्या प्रमाणपत्राबाबत काही शंका उपस्थित झाल्यास प्रमाणपत्राच्या सत्यतेबाबत [illegible] संबंधीत जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाकडून खात्री करण्यात यावी.

५. उपरोक्त विषयी आपल्या स्तरावरून आदेश निर्गमीत करणे बाबत आपणास विनंती करण्यात येत आहे. (अधिक माहितीसाठी पुणे विद्यापीठाने केलेल्या कार्यवाहीचे पत्र सोबत जोडले आहे.)

दीपक ह. शिंदे,
कर्नल (निवृत्त)
उपसचिव (प्रशासन)
संचालनालय

सोबत : वरील प्रमाणे

E:\DSW-९०\DSW-२६ - New\Current files\२०१८ (Edu Corrs).doc

उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभागाच्या अधिपत्याखालील सर्व शैक्षणिक संस्थांमधून मागास प्रवर्गाकरिता राखीव जागा ठेवण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग,
शासन शुद्धिपत्र क्रमांक : युएसजी-१४९३/(२४२८)/विशि-४,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ७ फेब्रुवारी, १९९६.

वाचा : १) शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग क्र. युएसजी-१४९३/२४२८/विशि-४, दि. २३ जून, १९९४ व समक्रमांकित शुद्धिपत्रक दिनांक -१२ जुलै, १९९४.

२) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, क्रमांक- सीबीसी-१४९४/प्र.क्र. २३६/मावक-५, दि. १३ जून, १९९५ व समक्रमांकित शुद्धीपत्रक दिनांक १५ जून, १९९५.

३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी-१०९४/प्र.क्र. ६८/९४/१६-ब, दिनांक १५ जून, १९९५.

४) शासन निर्णय, क्रमांक - युएसजी-१४९३/(२४२८)/विशि-४ दिनांक २२ जून, १९९५.

शासन शुद्धिपत्र :- शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग क्रमांक युएसजी-१४९३/(२४२८)/विशि-४, दि. २२ जून, १९९५ च्या परिच्छेद ४ व ५ मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहेत -

२. परिच्छेद - ४ : सदर आरक्षण प्रत्येक संस्थेमध्ये अभ्यासक्रम निहाय असेल आणि ते मुक्त आणि मुल्याधारित जागांकरिता त्यांच्या त्यांच्या प्रमाणात असेल.

तंत्रशिक्षण विभाग वगळता इतर शैक्षणिक विभागांतर्गत येणाऱ्या बिगर राखीव जागा या प्रथमत: भरण्यात याव्यात. यामध्ये गुणवत्तेनुसार असणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांचा देखील समावेश अराखीव उमेदवार म्हणून असेल. या विद्यार्थ्यांचा समावेश आरक्षणामध्ये करण्यात येऊ नये. यासाठी विद्यार्थ्यांनी आपला प्रवेश अराखीव म्हणून समजण्यासाठी पसंती कळविण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. उर्वरित जागा आरक्षणानुसार भरण्यात याव्यात असे करताना शैक्षणिक संस्थांमध्ये मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे प्रमाण ५२ टक्केपेक्षा अधिक झाले तर त्यास कोणतीही हरकत नाही.

परिच्छेद-५ मधील "मात्र बदलाबदलीने इतर प्रवर्गातून/पासून ५२% पेक्षा अधिक असणार नाही" हे शेवटचे वाक्य पूर्णत: वगळण्यात यावे.

४. हे शुद्धीपत्रक सामान्य प्रशासन विभागाच्या संमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

अ. मा. भट्टलवार
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत -
सर्व अकृषि विद्यापीठांचे कुलगुरू
सर्व अकृषि विद्यापीठांचे कुलसचिव.

विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व
विशेष मागासप्रवर्गांना लागू करण्यात आलेल्या प्रगत व
उन्नत गटाचे तत्वाच्या (नॉन क्रिमीलेअर) अनुषंगाने
जाती दाखले देण्याचे नमुन्यात बदल करणेबाबत

# महाराष्ट्र शासन

सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक : सीबीसी-१०/२००६/प्र.क्र. १५/मावक-५
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२
दिनांक : ३० जून, २००६

वाचा,

१. शासन निर्णय, सामान्य प्रशासन वि. क्रमांक : बीसीसी-१०९३/२१६७/ सीआर-१४१/९३/१६ व दिनांक २३ मार्च, १९९४.
२. शासन निर्णय स.क. सां.का. व क्री. विभाग क्रमांक : सीबीसी १०९४/प्र.क्र.८६/मावक-५, दिनांक १६ जून, १९९४ व दि. २२ जून, १९९४
३. शा.नि. सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी-१०९४/प्र.क्र.६८/९४/१६-ब, दिनांक १५ जून, १९९५
४. शा.नि.स.क.,सां.का. व क्री. विभाग क्र. सीबीसी-१०९४/प्र.क्र.८६/मावक -५, दिनांक ५ जून,१९९७
५. शा.नि.सा.न्या.सां.का. क्री व वि.स. विभाग क्र. सीबीसी-१०/२००१/प्र.क्र.१२०/ मावक-५ दिनांक १ नोव्हेंबर, २००१.
६. शा.नि.सा.न्या.सां.का. का व वि. स. विभाग क्र. सीबीसी-१०/२००१/प्र.क्र.१११/ मावक-५ दिनांक २९ मे, २००३
७. शा.नि.सा.न्या.सां.का. व वि.स. विभाग क्र. सीबीसी-१०/२००६/प्र.क्र.१५/ मावक-५ दिनांक ५ जून, २००६

**प्रस्तावना :**

सामान्य प्रशासन विभाग, दिनांक २३ मार्च, १९९४ च्या शासन निर्णयानुसार केवळ भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड) आणि इतर मागासवर्गांना उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमीलेअरचे) तत्त्व लागू केलेले आहे. आता महाराष्ट्र राज्य लोकसेवा- अनुसूचित जाती/जमाती व विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागासप्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण अधिनियम-२००१ मधील कलम चार पोट कलम २(दोन) च्या परंतुका अन्वये उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमीलेअरचे) तत्त्व अनुसूचित जाती

[illegible] अनुसूचित जमाती [illegible] विमुक्त जाती (अ) [illegible] भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड) [illegible] इतर मागासवर्ग आणि विशेष मागासप्रवर्ग [illegible] लागू [illegible] उन्नत व प्रगत गट (क्रिमीलेअर) [illegible] सूचना देण्यात येत आहेत.

शासन परिपत्रक :

[illegible] अधिनियम २००१ हा अधिनियम अंमलात आल्यापासून दिनांक २९ जानेवारी, २००४ पासून अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळून विमुक्त जाती, विमुक्त जाती - अ, भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड) इतर मागासवर्ग आणि विशेष मागासप्रवर्ग यांना उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमीलेअरचे) तत्व लागू करण्यात येत आहे.

२. पदोन्नती वगळता ज्या ज्या प्रयोजनाकरिता आरक्षणाचे आदेश लागू करण्यात आलेले आहेत, त्या त्या सर्व प्रयोजनाकरिता क्रिमीलेअरचे तत्व लागू राहील व त्याप्रमाणे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

३. उन्नत व प्रगत गटाच्या (क्रिमीलेअरच्या) मार्गदर्शक तत्वासंदर्भात सामान्य प्रशासन विभागाने व विहित उत्पन्न मर्यादेबाबत या विभागाने वेळोवेळी काढलेले आदेश विचारात घेण्यात यावेत.

४. संदर्भाधीन शासन निर्णय क्रमांक १५ जून, १९९४ मधील मुद्दा क्रमांक ४ खाली, "हे आदेश भटक्या जमाती (क), धनगर व तत्सम जाती, भटक्या जमाती (ड) वंजारी व तत्सम जाती आणि इतर मागासवर्ग यांना लागू राहतील" हा परिच्छेद वगळण्यात येत आहे. दिनांक १ नोव्हेंबर, २००१ च्या शासन निर्णय परिशिष्ट 'क', 'ड' व 'इ' नमुने रद्द समजण्यात यावेत.

५. अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती सोडून विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग यांना उन्नत व प्रगत गटाच्या तत्वानुसार प्रमाणपत्राचा नमुना परिशिष्ट 'क' प्रमाणे राहील. तथापि, फक्त जाती प्रमाणपत्राची मागणी केल्यास त्या उमेदवारास परिशिष्ट 'ड' प्रमाणे जातीचे प्रमाणपत्र देण्यात यावे.

६. या विभागाच्या उपरोक्त दिनांक ५ जून, २००६ रोजी निर्गमित केलेले शासन परिपत्रक रद्द करण्यात येत आहे.

हे शासन निर्णय सामान्य प्रशासन विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे. तरी सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी वरील सूचना तातडीने अंमलात आणाव्यात.

सदरचे शासनपरिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक २००६०७१०१२२४१८० असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(बलदेव चंद)

[illegible] सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

सर्व विभागीय आयुक्त,
प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा/अपील शाखा, मुंबई (पत्राने)
संचालक, समाज कल्याण, संचालनालय महाराष्ट्र राज्य, पुणे
राज्यपाल यांचे सचिव,
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
उप मुख्यमंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
मुख्य सचिव/ अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव,
सर्व मंत्रालयीन विभाग
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व जिल्हा न्यायालये
*प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई
*प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा , मुंबई.
*प्रबंधक, लोकआयुक्त व उप लोक-आयुक्त यांचे कार्यालय,मुंबई
*प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, नागपूर.
*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
उप संचालक, अनुसूचित जाती / जमाती आयोग, भारत सरकार
मार्ग, तांबे पेठ, पुणे-४११ ०३०.
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र राज्य
संचालक, समाजकल्याण, पुणे.
संचालक, सेवायोजन, मुंबई.
आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक.
आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.
सहाय्यक आयुक्त (मागासवर्ग कक्ष), सर्व विभागीय आयुक्तांची कार्यालये,
महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर.
महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा परीक्षा), मुंबई/नागपूर.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
सर्व मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
निवडनस्ती,
*पत्राने.

(२३)



संवैधानिक आरक्षण ५० टक्क्यापेक्षा जास्त होऊ न देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
शासन निर्णय क्र. टीईएम ३३९७/१२९२६/(९०८६)/तांशि-१
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ११ जुलै, १९९७.

संदर्भ :
१) शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग क्र. युएसजी १४९३/२४२८/विशि-४, दि. २३ जून, १९९४ व समक्रमांकित शुद्धिपत्रक दि. जुलै, १९९४.
२) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग क्रं. सीबीसी/१४९४/प्र.क्र. २३६/मावक-५, दि. १३ जून, १९९५ व समक्रमांकित शुद्धिपत्रक दि. १५ जून, १९९५.
३) शासन निर्णय, क्र. सामान्य प्रशासन विभाग क्र. बीबीसी १०९४/प्र. क्र. ६८/९४/१६-ब, दि. १५ जून, १९९५ व शुद्धिपत्रक दि. २१ मार्च, १९९६.
४) शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग क्र. युएसजी १४९३/२४२८/विशि-४, दि. २२ जून, १९९५.
५) अतिरिक्त सरकारी वकील, मुंबई उच्च न्यायालय, मुंबई यांचे पत्र क्र. एडीटीएल/डब्ल्युपी/एसएसजी दि. १०-७-१९९७.

प्रस्तावना :

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी १०९३/१६७/सीआर-१४१/४१/९३/१६-ब, दि. २३ मार्च, १९९४ अन्वये विविध मागास प्रवर्गासाठी एकूण ५० टक्के आरक्षण विहित करण्यात आले होते. नंतर सामाजिकदृष्ट्या व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या काही जातींच्या विकासासाठी काही सवलती व उपाययोजना करणे आवश्यक असल्यामुळे शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी/१०९४/प्र. क्र. ६८/९४/१६-ब, दि. ८ डिसेंबर, १९९४ चे परिशिष्ट अ मध्ये नमूद केलेल्या जातीसाठी एक स्वतंत्र विशेष मागास प्रवर्ग असे संबोधण्यात येऊन त्यांच्यासाठी २ (दोन) टक्के आरक्षण ठेवण्यात आले होते. तसेच या प्रवर्गासाठी क्रिमिलीयरचे तत्व लागू नाही हेही स्पष्ट करण्यात आले होते.

दि. ८ डिसेंबर, १९९४ च्या सामान्य प्रशासन विभागाच्या शासन आदेशास अनुसरून उच्च व तंत्रशिक्षण विभागाने विशेष मागास प्रवर्गासाठी २ टक्के आरक्षण ठेवून शासन निर्णय क्र. युएसजी १४९३/(२४२८)/विशि-४, दि. २२ जून, १९९५ अन्वये विविध आरक्षणाबाबत आदेश निर्गमित केले आहेत. सदर निर्णयाद्वारे विशेष मागास प्रवर्गासाठी २ टक्के आरक्षणाची तरतूद करण्यात आली असून एकूण आरक्षण ५२ टक्के विहित केले आहे. भारतीय संविधान अनुच्छेद १४ तसेच १६ अन्वये सर्व प्रवर्गातील घटकाना समानता व समान संधी मिळावी म्हणून मा. सर्वोच्च न्यायालयाने १९९३ साली मागासवर्गीय प्रवर्गासाठी आरक्षण ५० टक्क्यापेक्षा जास्त असू नये असा निवाडा दिला आहे.

रिट याचिका क्र. २९८९/१९९७, श्री. पांडुरंग एस. पखाले विरुद्ध महाराष्ट्र शासन व इतर, या प्रकरणी सुनावणी सुरु असताना मा. उच्च न्यायालयाच्या मुंबई खंडपीठाने अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाच्या १९९७-९८ या शैक्षणिक वर्षाच्या प्रवेश नियमावलीत संवैधानिक आरक्षणासाठी केलेली ५२ टक्के जागांची तरतुद मा. सर्वोच्च न्यायालयाने इंद्रा सॉहनी विरुद्ध केंद्र या प्रकरणी १९९३ साली दिलेल्या निवाड्यानुसार नसल्यामुळे कायदेशीर नसल्याचे शासनाचे निदर्शनास आणून दिले आहे. (संदर्भ १९९३ मा. सर्वोच्च न्याय्यालय ए. आर. पू. क्र. ४७७, शीर्ष टिप्पणी (डब्ल्यू) प्रवेश नियमावलीतील

राज्य शासनाने संवैधानिक आरक्षणासाठी केलेली ५२ टक्के जागांची तरतूद ही मा. सर्वोच्च न्यायालयाचा अवमान ठरू शकते असेही मा. उच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. यावर संवैधानिक आरक्षणांचे प्रमाण ५२ टक्क्यावरून ५० टक्के करण्याबाबतचे आदेश तात्काळ निर्गमित करण्यात येतील असे शासनातर्फे प्रतिपादन केल्यानंतर मा. उच्च न्यायालयाने समाधान व्यक्त केले असून उपरोक्त संदर्भात शासन आता खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**शासन निर्णय :**

शासन आता या शासन निर्णयाद्वारे असे आदेश देत आहे की, उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अधिपत्याखाली येत असलेल्या सर्व शैक्षणिक संस्थातील अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी या विभागाने निर्गमित केलेल्या शासन निर्णय क्र. युएसजी १४९३/(२४२८)/विशि-४, दि. २२ जून, १९९५ अन्वये विशेष मागास प्रवर्गाकरिता राखून ठेवण्यात आलेल्या २ टक्के जागांचे आरक्षणाबाबत पुढील आदेशापर्यंत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे. हे आदेश १९९७-९८ या शैक्षणिक वर्षापासून लागू करण्यात येत असून तात्काळ अंमलात येतील व उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत शैक्षणिक संस्थातील सर्व विद्या शाखांतील अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी लागू राहतील.

१. विशेष मागास प्रवर्गात ज्या जाती आहेत त्यापैकी काही जाती इतर मागासवर्गीयांमध्ये समाविष्ट होत्या. त्यामुळे सुरुवातीस विशेष मागास प्रवर्गाचे प्रमाणपत्र धारक उमेदवारांची जात ज्या मागास प्रवर्गामध्ये समाविष्ट होती. त्या मागास प्रवर्गाच्या आरक्षणासाठी पात्र समजण्यात यावी.

२. भारतीय संविधानुसार मंडल आयोगाने केलेल्या शिफारशीनुसार शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग क्र. टीईएम १०२४/(६३०३) तांशि-१, दि. ३ जून, १९९४ मधील परिच्छेद क्र. ४ मध्ये विहित केल्याप्रमाणे एकूण ५० टक्के जागा आरक्षित करण्यात याव्यात. सदर आरक्षण प्रत्येक संस्थेमध्ये अभ्यासक्रम निहाय राहील. मुक्त (मेरीट सीटस्) तसेच मूल्यभारित (पेमेंट सीटस्) जागांकरिता त्यांच्या त्यांच्या प्रमाणात असावे.

३. गुणवत्ता यादीनुसार प्रवेश प्रक्रिया केल्यानंतर जर कोणत्याही मागासवर्गीय प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागापैकी काही जागा रिक्त राहिल्या तर त्या जागेवर एकूण प्रवेश क्षमतेच्या जास्तीत जास्त २ टक्के पर्यंत प्रवेशासाठी विशेष मागास प्रवर्गीय उमेदवारांना प्रवेशासाठी प्राधान्य देण्यात यावे.

४. रिक्त जागांवर विशेष मागास प्रवर्गातील उमेदवाराना कमाल २ टक्के जागांवर प्रवेश दिल्यानंतर जर जागा रिक्त राहिल्या तर त्या जागा इतर सर्व मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांची गुणवत्तेनुसार सरांमसल करून भरण्यात याव्यात.

३. शासन यापुढे असेही आदेश देत आहे की, १९९७-९८ या शैक्षणिक वर्षासाठी ज्या अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असेल व दि. ९-७-१९९७ रोजी किंवा तत्पूर्वी या विभागाच्या दि. २२ जून, १९९५ च्या शासन निर्णयानुसार प्रवेश देण्यात आले असतील तर त्याबाबत पुढील कार्यवाही करण्यात यावी.

१. विशेष मागासवर्ग प्रवर्गातर्गत करण्यात आलेल्या प्रवेशास बाधा न आणता पुढील प्रवेश प्रक्रियेत काही कारणास्तव होणाऱ्या रिक्त जागांवर ५० टक्के आरक्षित जागा जुळवून घ्याव्यात.

२. संवैधानिक आरक्षण कुठल्याही परिस्थितीत ५० टक्क्यापेक्षा जास्त होणार नाही याची दक्षता घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

औ. शि. विहाडे
शासनाचे सहसचिव

प्रति -

कुलसचिव, सर्व विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**विशेष कक्ष विद्यापीठ प्रशासन व पदव्युत्तर अधिविभाग स्थायी समितीच्या उपसमिती बैठकीचा कार्यवृत्तांत**

मा. अधिविभागप्रमुख, संख्याशास्त्र अधिविभाग यांच्या दि. २९/६/२०१८ रोजीच्या पत्रास अनुसरुन व सर्व अधिविभागांच्या शैक्षणिक वर्ष २०१८–१९ मधील विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता यादीमधील समांतर आरक्षण विषयक कार्यवाही करणेसाठी विशेष कक्ष विद्यापीठ स्थायी समितीच्या उपसमितीची बैठक शुक्रवार दिनांक २९ जून २०१८ रोजी विद्यापीठ कार्यालयामध्ये दुपारी ४.३० वाजता आयोजित केली होती.

सदर बैठकीसाठी उपस्थितीतीचा अहवाल खालीलप्रमाणे –

| | | |
|---|---|---|
| १) डॉ. एस. डी. शिंदे, भुगोल अधिविभाग | — | अध्यक्ष |
| २) डॉ. ए. एम. सरवदे, इंग्रजी अधिविभाग | — | सदस्य |
| ३) श्रीमती एन. डी. पाटील | — | सदस्या |
| ४) श्री. ए. एस. नलवडे, उपकुलसचिव | — | सदस्य सचिव |

— कामकाज —

बैठकीच्या सुरूवातीस उपकुलसचिव, विशेष कक्ष (सदस्य सचिव श्री. ए. एस. नलवडे) यानी सर्व उपस्थित समिती सदस्यांचे स्वागत केले.

संख्याशास्त्र अधिविभागाने दि. २९/६/२०१८ रोजी सादर केलेले माजी सैनिक आरक्षणासंदर्भातील पत्र तसेच माजी सैनिक आरक्षणासाठीची शासनाची दि.१३.८.२०१४, दि. १३.६.१९८५ रोजीचे परिपत्रके इ. अनुलक्षून खालीलप्रमाणे ठराव केले :–

१ संख्याशास्त्र अधिविभाग व पी.व्ही.डी.पी. महाविद्यालय, तासगाव येथील अपंग आरक्षणासंदर्भात विभागप्रमुख यांनी दि.२८.६.२०१८ रोजी विचारणा केली होती त्यास अनुसरुन विशेष कक्ष विभागाने आदेशान्वये संबंधित अधिविभागास अपंग प्रवर्गातील उपलब्ध विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता यादी तयार करावी व त्यातील गुणवत्ता अग्रक्रमानुसार एका विद्यार्थ्यास त्याच्या प्रवर्गांतर्गत (खुला किंवा सामाजिक प्रवर्ग) प्रवेश देता येईल असे कळविलेले आहे. विभागाने केलेली ही कार्यवाही विद्यार्थी प्रवेशासाठीच्या समांतर आरक्षणविषयक प्रचलित शासन धोरणानुसार आहे

.....२

२ संख्याशास्त्र अधिविभागप्रमुख यांनी दि. २९.६.२०१८ रोजी दिलेल्या पत्राच्या अनुषंगाने विद्यार्थी प्रवेशातील माजी सैनिक या समांतर आरक्षणांतर्गत दि. १३.८.२०१८ येथे उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय यांच्या परिपत्राकान्वये दिलेल्या निर्देशानुसार अधिविभागांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी असे ठरले.

**अ) प्रथम टप्पा** : खुल्या प्रवर्गातून समांतर आरक्षणाची पदे भरताना गुणवत्तेच्या निकषानुसार खुल्या प्रवर्गातील उमेदवारांची निवड यादी करावी. (या ठिकाणी खुल्या प्रवर्गात गुणवत्तेच्या आधारावर मागासवर्गीय उमेदवारांचाही समावेश होईल) या यादीत समांतर आरक्षणानुसार आवश्यक खुल्या प्रवर्गाच्या उमेदवारांची संख्या पर्याप्त असेल तर कोणताही प्रश्न उद्भवणार नाही. आणि त्यानुसार पदे भरावीत. जर या यादीत समांतर आरक्षणानुसार आवश्यक खुल्या प्रवर्गाच्या उमेदवारांची संख्या पर्याप्त नसेल तर खुल्या प्रवर्गासाठी राखीव समांतर आरक्षणाची पदे भरण्याकरिता सदर यादीतील आवश्यक पर्याप्त संख्येइतके शेवटचे उमेदवार वगळून पात्र उमेदवारांपैकी केवळ खुल्या प्रवर्गाचेच आवश्यक पर्याप्त संख्येइतके उमेदवार घेणे आवश्यक आहे.

**ब) दुसरा टप्पा** : त्या नंतर प्रत्येक सामाजिक आरक्षणाच्या प्रवर्गातील उमेदवारांच्या निवड यादया तयार कराव्यात. (जे उमेदवार यापूर्वीच टप्पा अ मध्ये सामिल झाले असतील त्यांना या यादीतून वगळावे. )

**क) तिसरा टप्पा** : वरील ब नुसार तयार करण्यात आलेल्या यादयांमध्ये सामाजिक आरक्षणातील प्रत्येक प्रवर्गाच्या विहित टक्केवारीनुसार अ येथे विषद केलेल्या कार्यपध्दतीनुसार समांतर आरक्षणाचे पुरेसे उमेदवार समाविष्ट करावेत. मात्र असे करताना सामाजिक प्रवर्गांतर्गत रहावे.

आभार प्रदर्शनानंतर बैठकीचे कामकाज समाप्त झाले.

29/6/18
श्री. ए. एस. नलवडे
सदस्य सचिव

29/6/18
डॉ. एस. डी. शिंदे
अध्यक्ष

अराखीव उमेदवारांकरीता (खुला प्रवर्ग) आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी शासकीय सेवा व शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेशाकरिता १० % जागा आरक्षित करण्याबाबत

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
**शासन निर्णय क्रमांक : राआधो ४०१९/प्र.क्र.३१/१६-अ**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक - ३१ मे, २०२१

वाचा:- १. शासन निर्णय क्रमांक राआधो ४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दि. १२ फेब्रुवारी, २०१९
२. शासन पत्र क्र. राआधो ४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दि. २० मार्च, २०१९
३. शासन पत्र क्र. राआधो ४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दि. २६ एप्रिल, २०१९
४. शासन पत्र क्र. राआधो ४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दि. ६ सप्टेंबर, २०१९
५. सा.प्र.वि., परिपत्रक क्र. राआधो ४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दृ. २८जुलै, २०२०
६. शासन निर्णय क्र. राआधो/४०१९ प्र.क्र.३१/१६ अ, दि.२३ डिसेंबर, २०२०

प्रस्तावना :-

संसदेने संविधानात १०३ व्या घटनादुरूस्तीनुसार आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी शैक्षणिक संस्थामध्ये प्रवेशासाठी व शासन सेवेतील नियुक्त्यांमध्ये १० टक्के आरक्षण विहित केलेले आहे. त्यानुसार राज्य शासनाने मा.मंत्रिमंडळाच्या मान्यतेने संदर्भ क्र.१ अन्वये अराखीव उमेदवारांकरीता (खुला प्रवर्ग) आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी (ईडब्ल्यूएस) राज्यातील शैक्षणिक संस्थामध्ये प्रवेशासाठी व शासन सेवेतील नियुक्त्यांमध्ये १० टक्के आरक्षण लागू केले आहे. सदर आरक्षणाच्या लाभासाठी ज्या घटकांना राज्यात कोणत्याही मागास प्रवर्गातील आरक्षणाचा लाभ दिला जात नाही, अशा अराखीव उमेदवारांचा (खुला प्रवर्ग) आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांचा समावेश करण्यात आला आहे.

राज्यातील शैक्षणिक संस्थामध्ये प्रवेशासाठी व शासन सेवेतील नियुक्त्यांमध्ये राज्यात सामाजिक व शैक्षणिक मागास (एसईबीसी) वर्गास " महाराष्ट्र राज्य सामाजिक आणि शैक्षणिक (एसईबीसी) वर्गाकरिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे ) आरक्षण अधिनियम,२०१८ (सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६२) " मधील तरतूदींन्वये आरक्षण असल्याने राज्यात एसईबीसी प्रवर्गातील उमेदवार ईडब्ल्यूएस आरक्षणाच्या लाभासाठी अनुज्ञेय नाहीत. तथापि, ईडब्ल्यूएस आरक्षणाच्या लाभाबाबतचे केंद्र व राज्य शासनाचे निकष हे वेगवेगळे असल्याने केंद्र शासनाच्या सेवा व प्रवेश यामध्ये एसईबीसी उमेदवार हा केंद्र शासनाच्या निकषाच्या पूर्तता करुन ईडब्ल्यूएस

आरक्षणाचा लाभास पात्र असल्याबाबत संदर्भ क्र.२ अन्वये कळविण्यात आले आहे. तसेच राज्य शासनाच्या सेवा व प्रवेशात एसईबीसी उमेदवारास ईडब्ल्यूएस लाभाबाबत संदर्भ क्र. ३ ते ५ अन्वये आवश्यक सूचना देण्यात आल्या होत्या.

दरम्यान मा. सर्वोच्च न्यायालयाने एसएलपी (सी) नं.१५७३७/२०१९ मध्ये दि.०९.०९.२०२० रोजीच्या अंतरीम आदेशान्वये स्थगिती दिलेली असल्याने, सदर प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालयाचा अंतिम निर्णय प्रलंबित असल्याची बाब लक्षात घेता, शैक्षणिक प्रवेश व पदभरती प्रक्रिया यामध्ये उद्भवलेल्या अडचणी विचारात घेवून तसेच विविध न्यायालयीन प्रकरणी झालेल्या निर्णयानुसार मा.मंत्रिमंडळाच्या दिनांक २३.१२.२०२० रोजीच्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार, संदर्भ क्र. ६ अन्वये सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास (एसईबीसी) वर्गातील उमेदवारांना सन २०२०-२१ या वर्षातील शैक्षणिक प्रवेश घेण्यासाठी व सरळसेवा भरतीकरीता आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांचे (ईडब्ल्यूएस) प्रमाणपत्र देण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार एस.ई.बी.सी. प्रवर्गातील उमेदवारांना अराखीव पदांचा (खुला प्रवर्ग) अथवा ईडब्ल्यूएस आरक्षण हा लाभ ऐच्छिक ठेवण्यात आला आहे. तसेच ईडब्ल्यूएस आरक्षणाचा लाभ घेतल्यास सदर उमेदवारांस एस.ई.बी.सी. प्रवर्गासाठी असलेल्या आरक्षणाचा लाभ अनुज्ञेय रहाणार नसल्याबाबत नमूद करण्यात आले होते.

आता, मा .सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल अपिल नं. ३१२३/२०२० [एसएलपी (सी) नं.१५७३७/२०१९] प्रकरणी दिनांक ०५.०५.२०२१ रोजीच्या अंतिम आदेशान्वये एस.ई.बी.सी . आरक्षण अवैध ठरविले असल्याने ,एस.ई.बी.सी. प्रवर्गातील उमेदवारांना मागासवर्ग आरक्षण लागू नाही .त्यामुळे एस.ई.बी.सी प्रवर्गातील उमेदवार हे अराखीव पदांच्या लाभासाठी अनुज्ञेय आहेत. सबब सदर उमेदवार जर दि.१२.२.२०१९ रोजीचा शासन निर्णयानुसार खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटक आरक्षणाच्या लाभासाठीच्या पात्रतेबाबतच्या निकषांची पूर्तता करत असतील तर त्यांना आर्थिक दुर्बल घटक आरक्षणाचा लाभ अनुज्ञेय आहे. सदर बाब विचारात घेता दि. १२.०२.२०१९ रोजीच्या शासन निर्णयात सुधारणा करण्याची बाब शासनाचे विचाराधीन होती.त्यानुसार शासन आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांच्या आरक्षणाबाबत खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे -:

**शासन निर्णय :**

मा.सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल अपिल नं. ३१२३/२०२० या प्रकरणी दिनांक ०५.०५.२०२१ रोजी दिलेल्या सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास (एसईबीसी) आरक्षणासंदर्भातील निर्णयास अनुसरुन, आर्थिकदृष्टया दुर्बल घटक आरक्षणासंदर्भात खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

१) दि.१२.२.२०१९ रोजीच्या संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयातील परिच्छेद क्र. २ (अ) (ब) खालीलप्रमाणे सुधारीत करण्यात येत आहे.

परिच्छेद २. आर्थिकदृष्टया दुर्बल घटकासाठीच्या आरक्षणाचा लाभ खालील अटींच्या अधीन अनुज्ञेय राहील -:

(अ)राज्यातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकासाठी ज्या व्यक्तीच्या जातींचा समावेश महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती ,निरधिसूचित जमाती , (वि.जा.) भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण) अधिनियम ,२००१ (सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ ) यामध्ये समावेश नाही त्यांच्यासाठी शासकीय शैक्षणिक संस्था/ अनुदानित विद्यालये, महाविद्यालये, शैक्षणिक संस्था, विना अनुदानित विद्यालये, महाविद्यालये, शैक्षणिक संस्था, स्वायत्त विद्यापिठे यामध्ये एकूण प्रवेश द्यावयाच्या जागांमध्ये १०% आरक्षण विहित करण्यात येत आहे. सदर आरक्षण राज्य घटनेच्या अनुच्छेद ३० च्या खंड (१) मध्ये संदर्भीत अल्पसंख्याक संस्थामध्ये लागू होणार नाही.

तसेच शासकीय आस्थापना, निमशासकीय आस्थापना मंडळे/ महामंडळे/ नागरी स्थानिक स्वराज्य संस्था/ग्रामिण स्थानिक स्वराज्य संस्था ,प्राधिकरणे यांच्या आस्थापनेवरील सरळसेवेच्या पदांच्या कोणत्याही संवर्गातील नियुक्तीसाठी १०% ही आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी राखीव राहतील.

(ब) हे १०% आरक्षण राज्यात सध्या राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती, (वि.जा.) भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण) अधिनियम,२००१) (सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८) अन्वये विहित करण्यात आलेल्या मागासवर्गांसाठी आरक्षणाव्यतिरिक्त राहील.

२) आर्थिकदृष्टया दुर्बल घटकाच्या आरक्षणाच्या लाभासाठी पात्रतेबाबतचे निकष व कार्यपध्दती ही दिनांक १२.२.२०१९ रोजीच्या शासन निर्णयातील परिच्छेद २(क) व २(ड) प्रमाणे कायम राहतील. परिच्छेद २ (क) (३) मध्ये नमूद प्रमाणपत्रासंदर्भातील परिशिष्ट- अ ही सदर शासन निर्णयासोबत जोडल्यानुसार राहतील.

३) दि.१२.२.२०१९ रोजीच्या शासन निर्णयातील परिच्छेद २(इ) मधील (४) वगळता अन्य तरतूदी या दि.१२.२.२०१९ मधील कायम राहतील. परिच्छेद (इ) (४) मधील तरतूद रद्द करण्यात येत आहे.

४) ईडब्ल्यूएस प्रमाणपत्र हे मागील आर्थिक वर्षाच्या उत्पन्न व मत्ता या आधारे देण्यात यावे. तसेच प्रमाणपत्राच्या ग्राहयता कालावधी हा त्या आर्थिक वर्षापर्यंत समजण्यात यावा. तसेच दि.१२.२.२०१९ ते ३१.३.२०१९या कालावधीत निर्गमित करण्यात आलेल्या प्रमाणपत्रांचा ग्राहयता कालावधी मार्च २०२०पर्यंत समजण्यात यावा.

तसेच ज्या निवड प्रक्रियांमध्ये एक पेक्षा अधिक टप्पे समाविष्ट असतील अथवा निवड प्रक्रिया या पुढील आर्थिक वर्षामध्ये पूर्ण होणार असतील अशा प्रकरणी प्रमाणपत्राच्या ग्राहयतेबाबतचा दिनांक जाहिरातीमध्ये स्पष्ट नमूद करणे आवश्यक राहील.

५) संदर्भ क्र.२ अन्वये सूचित केल्यानुसार, केंद्र शासनामधील नागरी सेवा व पदे यामध्ये सरळसेवा प्रवेशासाठी व शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशाकरीता आर्थिकदृष्टया दुर्बल घटकासाठी केंद्र शासन वेळोवेळी निश्चित करेल त्या निकषांच्या आधारे केंद्र शासनाने विहित केलेल्या नमुन्यात सक्षम प्राधिकाऱ्यांनी प्रमाणपत्र देणे बंधनकारक आहे.

६) एसईबीसी प्रवर्गासाठी संदर्भ क्र. ३ ते ५ अन्वये देण्यात आलेले आदेश रद्द समजण्यात यावे.

७) एस.ई.बी.सी. उमेदवारांना संदर्भ क्र.६ अन्वये देण्यात आलेले लाभ कायम ठेवण्यात येत असून एस.ई.बी.सी. उमेदवार ईडब्ल्यूएस लाभासाठी पात्र असल्यास त्यांना विहीत प्रमाणपत्राच्या आधारे ईडब्लूएस आरक्षणाचा लाभ घेता येईल.

८) संदर्भ क्र.६ अन्वये एसईबीसी उमेदवारांना आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांचा देण्यात आलेला लाभ खालीलप्रमाणे अनुज्ञेय राहील:-

(i) सदर लाभ एस.ई.बी.सी. आरक्षणाच्या अंतरीम स्थगितीपासून म्हणजे दि.९.९.२०२० पासून दि.५.५.२०२१ या कालावधीसाठी लागू राहील.

(ii) दि.९.९.२०२० पूर्वी ज्या निवड प्रक्रियांचा अंतिम निकाल लागलेला आहे परंतु उमेदवारांच्या नियुक्त्या प्रलंबित आहेत अशा प्रकरणी सदर आदेश पूर्वलक्षी प्रभावाने लागू राहतील.

(iii) ज्या निवड प्रक्रिया पूर्ण झाल्या आहेत व एस.ई.बी.सी. आरक्षणानुसार नियुक्त्या करण्यात आल्या आहेत अशा प्रकरणांमध्ये सदर आदेश अनुज्ञेय होणार नाहीत.

(iv) ज्या निवड प्रक्रिया या दि.९.९.२०२० पूर्वी पूर्ण होवून नियुक्ती आदेशानुसार उमेदवार हजर झाले होते व एस.ई.बी.सी. उमेदवारांचे ईडब्ल्यूएस प्रमाणपत्र अवैध ठरविले होते, अशा प्रकरणी सदर आदेश लागू नाहीत.

९) सदर आदेश यापुढील सर्व शैक्षणिक प्रवेशांसाठी लागू राहतील.

१०) आर्थिकदृष्टया दुर्बल घटक पात्रता प्रमाणपत्राच्या वैधतेबाबत नियुक्ती प्राधिकारी/ शंका उद्भवल्यास सदर प्रमाणपत्राची परिच्छेद २ (ड) मधील २ (i), (ii), (iii) नुसार अपील सादर करुन त्यानुसार पडताळणी करण्यात यावी.

११) संबंधित भरती वर्षात सदर आरक्षणांतर्गत सुयोग्य उमेदवार उपलब्ध न झाल्यास आरक्षणाचा अनुशेष पुढे न ओढता खुल्या प्रवर्गातून गुणवत्तेनुसार भरण्यात याव्यात.

१२) हा शासन निर्णय शासकीय/ निमशासकीय सेवा, मंडळे/महामंडळे, नगरपालिका / महानगरपालिका, जिल्हा परिषदा, शासकीय विद्यालय, महाविद्यालय, शासकीय शैक्षणिक संस्था, खाजगी विद्यालय, महाविद्यालय, शैक्षणिक संस्था, अनुदानित/विना अनुदानित विद्यालय, महाविद्यालय व शैक्षणिक संस्था आणि ज्यांना मार्गदर्शक आदेश देण्याचा अधिकार राज्य शासनाला आहे, अशी इतर सर्व प्राधिकरणे, सेवा व संस्था यांना लागू राहील. संबंधित यंत्रणांनी याबाबत आवश्यक त्या सूचना निर्गमित कराव्यात.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक २०२१०५३११२५०५९९४०७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

TIKARAM WAMAN KARPATE

Digitally signed by TIKARAM WAMAN KARPATE
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c97a9d6b23c34fddbfe8f6f6189c08328de56af131faf7d6c0a149c3a4cf1436, cn=TIKARAM WAMAN KARPATE
Date: 2021.05.31 13:07:37 +05'30'

(टि.वा.करपते)
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

१. मा. विरोधीपक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा/ विधानपरिषद,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई.
२. मा. सर्व सन्माननिय विधानसभा/ विधानपरिषद,व संसद सदस्य महाराष्ट्र राज्य
३. मा. राज्यपालांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबारहिल, मुंबई.
४. मा. मुख्यमंत्र्यांचे अप्पर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, (विधान परिषद) विधानभवन, मुंबई.
६. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, (विधान सभा) विधानभवन, मुंबई.
७. शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव.
८. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-१, मुंबई,
९. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-२, नागपूर,
१०.महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
११.प्रबंधक, मा.उच्च न्यायालय, मुळ न्याय शाखा, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
१२.प्रबंधक, मा.उच्च न्यायालय, अपिल शाखा, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
१३.प्रबंधक, मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
१४.प्रबंधक, मा. लोक आयुक्त व उप लोक आयुक्त, मुंबई.
१५.सर्व विभागीय आयुक्त/सर्व जिल्हाधिकारी/सर्व विभागीय जिल्हाधिकारी/उप विभागीय अधिकारी (प्रांत अधिकारी)/ सर्व तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार, महाराष्ट्र राज्य.
१६.सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य.
१७.सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.

३२

१८. उप सचिव (आस्थापना शाखा) , सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१९.सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव ,मंत्रालय, मुंबई.
२०.मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
२१.सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई.
२२.सचिव, राज्य माहिती आयोग, मुंबई.
२३.सरकारी वकील, उच्च न्यायालय, मुळ शाखा व अपील शाखा, मुंबई, औरंगाबाद, नागपूर,
२४.सरकारी वकील, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, औरंगाबाद, नागपूर,
२५.सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,
२६.सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका,
२७.विधिमंडळ ग्रंथालय, महाराष्ट्र विधानभवन, मुंबई
२८. सर्व महामंडळे , मंडळे आणि सार्वजनिक उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक,
२९.सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांची मध्यवर्ती कार्यालये, महाराष्ट्र राज्य,
३०.निवड नस्ती/कार्यासन १६-अ.

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. राआधो ४०१९/प्र.क्र.३१/१६ अ, दि. ३१.०५.२०२१ सोबतचे सहपत्र

**परिशिष्ट अ**

**महाराष्ट्र शासन**

प्रमाणपत्र क्र.

फोटो

**वर्ष -----------_करीता ग्राहय**

**आर्थिकदृष्टया दुर्बल घटकाच्या पात्रतेसाठी प्रमाणपत्र**

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र .राआधो/४०१९ प्र.क्र.३१/१६ अ, दिनांक ३१.०५.२०२१ अन्वये
(आर्थिकदृष्टया दुर्बल घटकासाठी विहित केलेल्या %१० आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी )

प्रमाणित करण्यात येते की, श्री/श्रीमती/कुमारी ----------------------- श्री/श्रीमती------------------------यांचा/यांची मुलगा/मुलगी गाव/शहर------------तालुका ------------ जिल्हा/विभाग -------------- महाराष्ट्र चे रहिवासी आहेत .तो/ती ------------ जातीचे असून जात /पोटजात /वर्ग चे असून सदर जात महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती ,निरधिसूचित जमाती, (वि.जा.) भटक्या जमाती (भ.ज.) ,विशेष मागास प्रवर्ग (वि.मा.प्र.) आणि इतर मागासवर्ग (इ.मा.व.) यांच्यासाठी आरक्षण) अधिनियम, २००१ (सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८) यामध्ये नमूद केलेल्या प्रवर्गांतर्गत होत नाही.

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्र. राआधो ४०१९/प्र.क्र.३१/१६ अ, दिनांक १२.०२.२०१९ अन्वये त्याच्या/तिच्या कुटूंबाचे सर्व स्त्रोतांचे वर्ष -------------मधील एकत्रित वार्षिक उत्पन्न रु. असून, सदर उत्पन्न रु.८,००,०००/- पेक्षा कमी आहे. त्यामुळे असे प्रमाणित करण्यात येत आहे की, तो/ ती यांचा आर्थिकदृष्टया दुर्बल घटकामध्ये समावेश होतो.

ठिकाण :

दिनांक:

स्वाक्षरी :

नाव :

पदनाम :

हे प्रमाणपत्र अर्जकर्त्याने सादर केलेल्या खालील कागदपत्र/पुरावे यांच्या आधारावर निर्गमित करण्यात येत आहे.

१
२
३

(३४)

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. राआधो ४०१९/प्र.क्र.३१/१६ अ, दि. ३१.०५.२०२१
सोबतचे सहपत्र
Annexure-A

**Government of Maharashtra**

Certificate No :

Photo

**(valid for Year )**
**Eligibility certificate for Economically Weaker Section**

(For the purpose of 10% reservation prescribed for Economically Weaker Section vide Government Resolution सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. राआधो 4019/प्र.क्र.31/16 अ dated 31.05.2021)

This is to certify that Shri/Smt/Kum -------------------------------------- is son /daughter/ward of ----------------------------- --------------He/ She is resident of village / city -----------------Taluka --------------- District -------- and he /she belongs to --------------- caste/sub caste /class which is not included in the cadres mentioned in the Maharashtra State Public services (Schedule Caste, Schedule Tribes, De-notified Tribes (Vimukta Jati), Nomadic Tribes, Special Backward category and Other Backward Classes) Act, 2001 ( Maharashtra Act No 8 of 2004).

As per norms prescribed Vide Government of Maharashtra, General Administration Department, and Government Resolution No. राआधो 4019/प्र.क्र.31/16 अ, dated 12.02.2019. His /Her gross family annual income for Year----------- from all source is Rs.---------------/- which is less than Rs.8,00,000/-. Therefore it is certified that he/ she is within category of Economically Weaker Sections.

Place :

Signature :

Date :

Name :

Designation:

(This certificate has been issued on the basis of following proof/evidences/documents)

1.
2.
3.